॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
असत्य हे अपंग प्राण्याप्रमाणे असते, दुसऱ्याच्या आधाराशिवाय ते कधीच उभे राहू शकत नाही.

आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट
'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर
आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.
आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप
आता बातमीबरोबरच बरेच काही
मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक १८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

## SPOT NEWS

### चुना हल्ल्यानंतर अजित दादांवर मधमाशांचा हल्ला

● **संगमेश्वर** – राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज रत्नागिरी दौऱ्यावर असून त्यांच्या संगमेश्वर दौऱ्यात मधमाशांचा हल्ला झाल्याने एकच धांदल उडाली. शनिवारी परभणी जिल्हा दौऱ्यावर असताना शेतकरीबांधवांनी अजित पवारांच्या ताफ्यावर चुना टाकून हल्ला चढविला होता. संगमेश्वर येथे मशमाशांनी अचानक केलेल्या हल्ल्यात अजित पवारांच्या ताफ्यातील अनेक पोलिस कर्मचारी आणि अधिकारी जखमी झाले आहेत.अजित पवार यांना सुरक्षित गाडीत बसवल्यामुळे अजित पवार मधमाशांच्या हल्ल्यापासून बचावले. संगमेश्वर येथील सरदेसाई यांच्या वाड्याची पाहणी करताना मधमाशांनी हा हल्ला केला. मधमांशांनी अचानक केलेल्या हल्ल्यामुळे ताफ्यातील अनेकांची पळापळ झाली, काहींनी तोंड झाकण्यासाठी गमछा, उपरणे वापलरल्याचं दिसून आलं. मधमांशांचा घोंगाट उठताच गाडीत बसण्यासाठी सर्वांची एकच धावपळ झाली होती. काहींनी हाताने मधमाशांना झटकण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, मधमाशांच्या हल्ल्याचा व्हिडिओ समोर आला असून त्यात माशाही पाहायला मिळत आहेत.

### पहलगाम हल्ल्यातील मृतांना 'नागरी शौर्य' पुरस्काराने गौरवावे

● **पुणे** – जम्मू काश्मीर राज्यातील पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांनी हिंमतीने संपूर्ण प्रसंगाचा सामना केला. म्हणूनच त्यांना येत्या एक मे रोजी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने नागरी शौर्य पुरस्कार देऊन गौरविण्यात यावे अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दुपारी दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. यामध्ये महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचा समावेश होता. यामध्ये डोंबिवलीतील अतुल मोने, संजय लेले आणि हेमंत जोशी, पुण्यातील कौस्तुभ गणबोटे, संतोष जगदाळे आणि पनवेल येथील दिलीप डिसले या पर्यटकांचा निष्पाप बळी गेला. आता या कुटुंबीयांना महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने नागरी शौर्य पुरस्कार देऊन गौरवण्यात यावे, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी सरकारकडे केली आहे. जम्मू काश्मीर या राज्यातील पहलगाम येथे पर्यटनासाठी गेलेल्या निष्पाप नागरिकांची हत्या करुन दहशतवाद्यांनी क्रौर्याची परिसीमा गाठली. या घटनेमुळे देशातील जनमानस शोकसंतप्त आहे.

# कर्जमाफीवरून राष्ट्रवादीत गोंधळ तर शेतकऱ्यांत संभ्रम

## कर्जमाफी महायुतीपुढे पेच । सरकारपुढील अडचणी वाढल्या



● **मुंबई । वीरभूमी–**
शेतक–यांची कर्जमाफी हा महायुती सरकारपुढे पेच आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते असा शेतकरी संघटनांचा दावा आहे. त्यामुळे हा प्रश्न सरकारपुढे अडचणीचा ठरत आहे.

नवे मंत्रिमंडळ अस्तित्वात येतात कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी कर्जमाफी या विषयावर हात झटकले होते. हा विषय आपल्या अखत्यारीत येत नाही, असे त्यांनी जाहीर केले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. या संदर्भात जिल्हा बँका तसेच सहकारी संस्था पुढे कर्ज वसुलीचा मोठा पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी आपले थकीत कर्ज अदा करावे, असे स्पष्ट केले होते.

सरकारच्या आर्थिक स्थितीमुळे उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे नेते कर्जमाफी होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर याबाबत मोठया प्रमाणावर टीका झाली शेतकरी संघटनांनी आता व्यक्त केला होता. त्यामुळे सावध होत कृषीमंत्री कोकाटे यांनी यासंदर्भात आपण मुख्यमंत्र्यांकडे हा विषय मांडू. मंत्रीमंडळाच्या बैठकीत कर्जमाफी विषयावर चर्चा करू अशी सावध भूमिका घेतली होती.

### मंत्र्यांमध्येच भिन्न मते

■ शेतकरी कर्जमाफीच्या प्रश्नावर विरोधी पक्ष देखील आग्रही आहे. काँग्रेसने याबाबत उपमुख्यमंत्री पवार यांच्यावर झोंबणारी टीका केली होती. त्याचे गांभीर्य जाणवू लागल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या मंत्र्यांमध्येच या विषयावर भिन्न मते असल्याचे दिसते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष कर्जमाफीच्या प्रश्नावर निर्माण झालेला गोंधळ केव्हा निवळणार? या चर्चेला नव्याने तोंड फुटले आहे.

### कर्जमाफीचा मुद्दा सोडला नाही : तटकरे

■ आता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही वेगळ्याच राग आळवला आहे. कर्जमाफीचा विषय पूर्णपणे सोडलेला नाही असे सांगत त्यांनी नाराज शेतकऱ्यांना चुचकारण्याचा प्रयत्न केला आहे. कर्जमाफीच्या प्रश्नावर शेतकऱ्यांचा आणि शेतकरी संघटनांचा रोष प्रामुख्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विषयी आहे. त्यामुळे यातून बाहेर पडण्यासाठी तटकरे यांनी ही भूमिका घेतली की काय? अशी चर्चा आहे.

## लाडक्या बहिणी १५०० रुपयांत खुश आहेत : मंत्री नरहरी झिरवळ

● **जळगाव । वीरभूमी–**
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री नरहरी झिरवळ यांनी महत्वाचे वक्तव्य केले असून १५०० रुपयांमध्ये सर्व लाडक्या बहिणी खूश आहेत. २१०० रुपये देणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

राज्यातील महायुती सरकारची मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना चांगलीच यशस्वी ठरली आहे. या योजनेमुळे विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड यश मिळाले. महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभेत लाडक्या बहिणींची १५०० रुपयांची असलेली रक्कम वाढवण्याची घोषणा केली होती. ही रक्कम २१०० रुपये करणार असल्याचे म्हटले होते. त्यामुळे महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर राज्यातील सर्वच लाडक्या बहिणी २१०० रुपये कधी मिळणार? त्याची वाट पाहत आहे.

जळगावात माध्यमांसोबत बोलताना मंत्री नरहरी झिरवळ म्हणाले, लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ, असे कोणीही म्हटलेले नाही. यापूर्वी विरोधक लाडक्या बहिणींना पंधराशे रुपये देखील देणार नाहीत, असा दावा करत होते. मात्र पंधराशे रुपये दिल्यानंतर विरोधकांनी आता २१०० रुपयांवर जास्त जोर धरला आहे. मला वाटते पंधराशे रुपये ही रक्कम देखील परिपूर्ण आहे. महिला पंधराशे रुपये मिळाल्यानंतरही खुश आहेत.

नरहरी झिरवळ यांनी सांगितले की माजी मंत्री अनिल पाटील माजी मंत्री छगन भुजबळ यांची देखील मंत्रिमंडळात वर्णी लागावी, अशी आमची इच्छा आहे. अजित पवार यावर निर्णय घेतील. मंत्रिमंडळात नवीन लोकांना संधी देण्याबाबत त्यांचे चांगले धोरण आहे. दोन नंबरचा व्यवसाय केला तर टायरमध्ये गेलाच म्हणून समजा, असे अजित पवार म्हणाले होते. त्यावर झिरवळ म्हणाले, दोन नंबरचा व्यवसाय केल्याने इतरांवर परिणाम होतो. त्यामुळे कदाचित यासंदर्भात अजित पवार बोलले असतील. यासंदर्भात मी ऐकले नाही, मात्र चर्चा आहे.

## हंगा येथे वेठबिगारीच्या विळख्यातून तीन युवकांची सुटका

● **नगर । वीरभूमी–**
पारनेर तालुक्यातील हंगा गावात मानवी तस्करीच्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे. श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाच्या स्वयंसेवकांना ग्रामस्थांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

२५ एप्रिल रोजी मध्यरात्री श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाचे संस्थापक दिलीप गुंजाळ, जिल्हा समन्वयक सिराज शेख व मंगेश थोरात यांनी हंगा गावात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांनी वेठबिगारीच्या गुलामगिरीत अडकलेल्या तीन युवकांची माहिती मिळवली. प्रकाश साळुंके या व्यक्तीने अहिल्यानगर रेल्वेस्थानक परिसरातून दुर्बल, परावलंबी व असंघटित अशा तीन युवकांना फसवून पळवून नेले होते आणि त्यांच्याकडून घरकाम, लोहारकाम, घोडे सांभाळणे व शेण उचलण्याचे काम बळजबरीने करून घेत होते.

या युवकांना कोणताही मोबदला न देता, काम न केल्यास त्यांना शिवीगाळ व मारहाण केली जात होती. युवकांच्या पाठीवर झालेल्या मारहाणीच्या जखमा



पाहून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सिराज शेख यांनी तातडीने सुपा पोलीस स्टेशनला संपर्क साधला. सुपा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे व पो. कॉ. विकास गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी तत्काळ कारवाई करत युवकांची सुटका केली.

सुटका केलेल्या युवकांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठवून, त्यांचे संरक्षण व पुनर्वसनाकरिता त्यांना श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाच्या मानवसेवा प्रकल्पात दाखल करण्यात आले आहे. यावेळी आरोपी प्रकाश साळुंके याला अटक करण्यात आली असून, त्याच्यावर भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) २०२३ चे कलम ११५, ३५१(२), ३५२, १२७(२) आणि बंदबिगार पद्धती अधिनियम १९७६ अंतर्गत कलम १६ व १८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाचे संस्थापक दिलीप गुंजाळ, सिराज शेख, मंगेश थोरात, संध्या कुलकर्णी, मयुरी वनवे, ऋतिक बर्डे तसेच आंतरराष्ट्रीय न्याय मिशन (आयजेएम) च्या लिला नंदा व गोरख जाधव यांनी महत्वाची भूमिका बजावली.

# सीना नदी सौंदर्यीकरण प्रकल्पाला मनपा आयुक्तांकडून गती

## 'आराधना वसुंधरेची' अभियानाअंतर्गत जलस्त्रोत स्वच्छतेची यशस्वी सांगता

● **नगर । वीरभूमी –**
जागतिक वसुंधरा दिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर महानगरपालिकेने 'आराधना वसुंधरेची' या विशेष उपक्रमांतर्गत शहरातील जलस्त्रोत स्वच्छता मोहीम राबवून पर्यावरण संवर्धनाकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. दोन दिवस चाललेल्या या मोहिमेची यशस्वी सांगता होत असताना, सीना नदी परिसराच्या सौंदर्यीकरणाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पालाही सुरुवात झाली आहे.

२७ एप्रिल रोजी नगर–कल्याण महामार्गावरील सीना नदीपात्र तसेच शहरातील इतर जलस्त्रोतांवर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सदस्यांनी नदीपात्रातील प्लास्टिक व न कुजणारा सुमारे दोन मेट्रिक टन कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. तसेच, आयुर्वेद कॉर्नरजवळील काठवण खंडोबा रोड पुलाजवळ नगर ट्रेकर्स ग्रुपच्या सदस्यांनी सलग दोन दिवस परिश्रम घेऊन सुमारे एक मेट्रिक टन कचरा हटविला. वडगाव गुप्ता रोडवरील आठरे पाटील पब्लिक स्कूलजवळील महानगरपालिकेच्या विहिरीतूनही प्लास्टर ऑफ पॅरिस व इतर कचऱ्याचे संकलन करून परिसर स्वच्छ करण्यात आला. या दोन दिवसीय अभियानाच्या दरम्यान एकूण साडेसात टनाहून अधिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली.

महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी या उपक्रमाच्या सांगतेप्रसंगी नागरिकांना पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तसेच, नदीपात्र किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकणाऱ्यांवर आता कठोर कारवाई करण्यात येईल व दंड आकारला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, 'आराधना वसुंधरेची' अभियानाच्या पुढच्या टप्प्यात सीना नदी परिसराच्या सुशोभीकरणाच्या कामालाही वेग देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या प्रयत्नातून सुमारे सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीच्या सहाय्याने नदीपात्राच्या दोन्ही किनाऱ्यांवर गॅबियन संरक्षक भिंती उभारण्यात येत असून, त्यामुळे अतिक्रमणास व अस्वच्छतेस आळा बसणार आहे.

याशिवाय, ऑक्सिजन पार्कच्या धर्तीवर नदीच्या काठावर प्रदूषण नियंत्रण करणारी झाडे, फुलझाडांचे रोपण, हिरवळीची निर्मिती तसेच नागरिकांसाठी अर्धा किलोमीटर लांबीचा आधुनिक वॉकिंग ट्रॅक, विश्रांतीसाठी खुल्या जागा आणि व्यायामासाठी सोयी–सुविधा उभारण्यात येत आहेत. पुणे महामार्गावरील फुलसौंदर मळा ते कल्याण रोडवरील अमरधाम पर्यंतच्या परिसरात हे काम सध्या सुरू असून, प्रकल्पाच्या अंदाजे वीस टक्के काम पूर्ण झाले आहे. पुढील सहा महिन्यांत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करून नागरिकांना एक



स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी परिसर देण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने सातत्याने पावले उचलत असून, नागरिकांच्या सहकार्याने शहर अधिक हरित व स्वच्छ बनवण्याचा संकल्प दृढ केला आहे.

# SPOT NEWS

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचा मुठभर धान्य, घोटभर पाणी उपक्रम

● **नगर । वीरभूमी–**

शहरातील कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी उन्हाळ्याच्या वाढत्या तापमानामुळे त्रस्त झालेल्या पक्ष्यांना आधार देण्यासाठी मुठभर धान्य आणि घोटभर पाणी! हा उपक्रम राबविला आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेने ४० अंशाच्यावर तापमान वाढत चाललेले असताना पक्ष्यांना जगणे सुसह्य होण्याच्या दृष्टीकोनान हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या परिसरासह प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःच्या घरी झाडांखाली, अंगणात, गच्चीवर आणि परिसरातील उद्यानांमध्ये धान्य व पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच विद्यार्थ्यांनी मुठभर चार प्रकारचे धान्य शाळेत आणून दिले. जमा झालेल्या धान्याच्या पोत्यातून दररोज धान्य शालेय परिसरातील झाडे व उद्यानात टाकून पक्ष्यांची भूक भागवली जात आहे. तसेच पाण्यासाठी खाऊच्या पैशातून विद्यार्थ्यांनी छोटे भांडे विकत घेऊन पाण्याची सोय केली आहे. उन्हाळ्यात पाणी व अन्नाच्या अभावामुळे अनेक पक्ष्यांचा मृत्यू होत असल्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देत मुख्याध्यापक शिवाजी लंके यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला. यासाठी शाळेतील शिक्षिका उर्मिला साळुंके, मीनाक्षी खोडदे, सुजाता दोमल, शितल रोहकले, शिल्पा कानडे, जयश्री खांदोडे, सोनाली अनभुले, रूपाली वाबळे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, इंदुमती दरेकर, पुनम धाडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक शिवाजी लंके यांनी सांगितले की, पशुसेवा ही ईश्वरसेवा आहे. मुक्या प्राण्यांप्रती दया व करुणा या मानवी मूल्यांचे बीज विद्यार्थी वयात रुजविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुठभर धान्य व घोटभर पाणी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेमाची भावना विकसित होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## निमगाव वाघा येथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

● **नगर । वीरभूमी–**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त १४ मे रोजी ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन होत असून, राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी या सोहळ्यास उपस्थित राहणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. छत्रपती संभाजी महाराज हे स्वयं उत्कृष्ट साहित्यिक होते. त्यांनी विविध भाषांचे सखोल अध्ययन केले होते तसेच अभ्यासपूर्ण ग्रंथनिर्मितीही केली होती. त्यांच्या कार्यातून नवोदित साहित्यिकांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी गावातून छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्यावर आधारित ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने होणार आहेत. मध्य सत्रात कवी संमेलन रंगणार असून, त्याद्वारे ग्रामीण भागातील काव्यप्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ विक्रीचेही आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या समारोपीय सत्रात सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग व पर्यावरण आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी इच्छुकांनी प्रस्ताव ७ मे २०२५ पर्यंत पै. नाना किसन डोंगरे, अध्यक्ष, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, निमगाव वाघा, ता. नगर, जि. अहिल्यानगर - ४१४००५. या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# घरा-घरात, लोकांच्या मनात शिवसेना असली पाहीजे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे । अकोले तालुक्यातील मारुती मेंगाळसह कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

● **अकोले । वीरभूमी–**

बजरंग बलीची ताकद ठेवणारा मारुती मेंगाळ व तुमची सर्वाची ताकद ६२ सरपंचसह कार्यकर्त्याचा आजचा प्रवेश मोठा आनंददायी आहे. तुमची अडचण निश्चित दुर होईल, शिवसेना वाढीसाठी काम करा. आपण विधानसभा जिंकलो पुढे स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, ग्रामपंचायत निवडणुका जिंकायच्या आहेत. तेथेही भगवा फडकवायचा आहे, गावा-गावात, वाडीवस्तीवर, घरा-घरात लोकांच्या मनात शिवसेना असली पाहिजे व सर्वत्र भगवा फडकला पाहिजे, अशी अपेक्षा राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख ना. एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

अकोले तालुक्यातील आदिवासी ठाकर समाजाचे नेते मारुती मेंगाळ व तालुक्यातील दुध संघाचे संचालक जगनशेट देशमुख, रामदास आंबरे, माजी नगरसेवक सचिन शेटे, बाळासाहेब भोर, सुशांत गजे, जावेद जाहगिरदार, रोहिदास जाधव, प्रकाश पाचपुते तसेच भाजपा, राष्ट्रवादीतील काही नेत्यांसह ६० सरपंच आणि कार्यकर्त्यांनी ठाणे येथे उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख ना. एकनाथ शिंदे यांचे हस्ते शिवसेनेत प्रवेश केला, याप्रसंगी ना.




शिंदे बोलत होते. यावेळी आमदार अमोल खताळ, शिवसेना सचिव राम रेपाळे, जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते, तालुकाप्रमुख संजय वाकचौरे, शर्मिला येवले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

ना. शिंदे म्हणाले की, माझे टॉनिक कार्यकर्ते आहेत. जनता हीच माझी उर्जा व प्रेरणा आहे. त्यामुळे मी कधीही थकत नाही. २४ तास माझे काम सुरु असते. मुख्यमंत्री असताना पायाला भिंगरी लावून राज्यभर फिरून अडीच वर्षात विकासाची कामे मार्गी लावली. महाविकास आघाडीने ज्या कामांना स्थगिती दिली होती. त्या कामांना चालना आपण महायुतीने दिली. सर्व सामान्य लोकांचे पैसे लोकांना देण्याचे काम मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून केले. लाडक्या बहिणीना योजना आणली त्यामुळे विधानसभेला लाडक्या बहिनींनी त्यांना दणका दाखवला. सर्वाचे आशिर्वाद व केलेली विकास कामे यामुळे इतिहासात पहिल्यांदा एवढा मोठा विजय महायुतीला मिळाला आहे.जनतेने आपल्या शिवसेना पक्षाला शिक्कामोर्तब केले. स्व. बाळासाहेब व आनंद दिघे यांचे विचार घेऊन आपण पुढे जात आहोत. सर्वसामान्य माणसाचे जीवनात सोन्याचे दिवस आणण्याचे काम आपण करत आहे. मी सुरूवातीपासुन एक कार्यकर्ता म्हणून काम केले व आजही करत आहे आणि भविष्यातही कार्यकर्ता म्हणूनच काम करणार. कार्यकर्ता हा नेहमी काम करणाऱ्या कार्यकर्त्याचे मागे उभा राहतो. जो कार्यकर्ता आपल्या नेत्याला, कार्यकर्त्याला आमदार, खासदार, मंत्री व मुख्यमंत्री बनवतो पण त्यानेही लक्षात ठेवले पाहिजे की, तो कार्यकर्ता जेव्हा संकटात, अडचणीत असेल तेव्हा नेत्याने त्याचे पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. हीच त्या सामान्य कार्यकर्त्याची माफक अपेक्षा असते. तेव्हाच तो कार्यकर्ता आपल्या नेत्यासाठी जीव देण्यासाठी तयार असतो. आपण आपल्या कार्यकर्त्यासाठी, शिवसैनिकासाठी सदैव सोबत आहे व राहू असा विश्वास ना. शिंदे यांनी देत. डॉ. जालिंदर भोर आपण आज सर्वात मोठे ऑपरेशन केले आहे. एवढ्या मोठ्या संख्येने आज शिवसेनेत प्रवेश केले अजून दुसराही टप्पा प्रवेशाचा होणार आहे त्यामुळे अकोले तालुक्यातील जे काही प्रश्न, विकासकामे बाकी आहेत ती सर्व आपण महायुतीचे माध्यमातून मार्गी लावु असा विश्वास कार्यकर्त्यांना दिला.

## पाथर्डी शहरात पहलगाम येथील हल्ल्याच्या निषेधार्थ मोर्चा



● **पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहरात मुस्लिम बांधव, मराठा सेवा संघ आदींच्या वतीने काश्मीरच्या पहलगाममध्ये आतंकवादी हल्ल्यामध्ये भारतीय नागरिकांची हत्या करणाऱ्या अतिरेक्यांचा मोर्चा काढून निषेध करण्यात आला.

पाथर्डी शहरातून सकाळी अजंठा चौकापासून नाईक चौकापर्यंत पाकिस्तान विरोधी घोषणा देत मोर्चा काढण्यात आला. तेथे विविध वक्त्यांनी भाषण करत निषेध नोंदवला. तसेच यावेळी अतिरेक्याच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

या निषेध मोर्चामध्ये कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष नासिर शेख, मराठा सेवा संघाचे रामदास बर्डे, उबेद आतार, चांद मनियार, लालाभाई शेख, शमाअली पठाण, देवा पवार, बबलू वावरे, किसन आव्हाड, संदीप काटे आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मोर्चा दरम्यान पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे व अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

## युवानेते विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त माहेगाव देशमुख येथे दिव्यांग बांधवांना पाणी जार वाटप

● **कोपरगाव । वीरभूमी–**

सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त एक अभिनव सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. नुकत्याच झालेल्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विवेकभैय्या कोल्हे यांनी वाढदिवसाचा सार्वजनिक उत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या सामाजिक भावनेने प्रेरित होऊन दिव्यांग बांधवांसाठी पाण्याच्या जार वाटपाचा उपक्रम प्रथम लोकनियुक्त मा.सरपंच बाळासाहेब दत्तात्रय पानगव्हाणे यांच्या पुढाकाराने करण्यात आला.

दिव्यांग बांधवांना शुद्ध पाण्याच्या जारचे वाटप करून त्यांच्या दैनंदिन जीवनात छोटासा पण मोलाचा हातभार लावण्याचा प्रयत्न यामुळे झाला आहे. समाजातील दुर्बल घटकांबद्दल आपुलकी व सहकार्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. या प्रसंगी सर्वांनी विवेकभैय्या कोल्हे यांच्या निर्णयाचे मनापासून कौतुक केले व सामाजिक जाणीवेतून साजऱ्या झालेल्या वाढदिवसाच्या निमित्ताने



त्यांच्या दीर्घायुष्याच्या आणि यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान साहेब, बाळासाहेब पानगव्हाणे, माजी संचालक दत्तात्रय पानगव्हाणे, माजी व्हाईस सोपानराव पानगव्हाणे, वसंतराव पानगव्हाणे, एकनाथराव पानगव्हाणे, उत्तमराव पानगव्हाणे, अशोकराव पानगव्हाणे, पी. आर. काळे साहेब, संतोष जाधव, विजय कदम, मारुती कदम, नितीन कदम, विजयराव पानगव्हाणे, प्रवीण पानगव्हाणे, सतीश पानगव्हाणे, रवींद्र पानगव्हाणे, राहुल पानगव्हाणे, उमेशराव पानगव्हाणे, विकास पानगव्हाणे, विलास जाधव, शशिकांत पानगव्हाणे, नामदेव पानगव्हाणे, रमेश भगुरे, वारोबा रोकडे, दिलीप पानगव्हाणे, आदेश पानगव्हाणे, अक्षय पानगव्हाणे, रमेश पानगव्हाणे, आप्पासाहेब पानगव्हाणे, दादासाहेब पानगव्हाणे, भास्कर पानगव्हाणे, बाळासाहेब काळे, विलास काळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवा हाच धर्म या भावनेने दिव्यांग बांधवांचे मोठे काम कोल्हे परिवार सातत्याने करत आहे. हजारो दिव्यांग बांधवांना आरोग्य तपासणी आणि उपचारांसाठी संजीवनी उद्योग समूह आणि कोल्हे परिवार नेहमी सेवाव्रत असल्याने हा उपक्रम आदर्श शुभेच्छा ठरला आहे.

# धामणगाव पाट येथील शिक्षक राजीव देशमुख यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

● **अकोले । वीरभूमी–**

तालुक्यातील धामणगाव पाट येथील सरस्वती विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक राजीव देशमुख हे ३३ वर्ष विज्ञान शिक्षक म्हणून आपली सेवा पूर्ण करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापूर्ती समारंभ अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. सिताराम पाटील गायकर यांच्या अध्यक्षतेखाली व अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकरराव नवले, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख व स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष सुधाकर आरोटे, अगस्ती नागरी पतसंस्थेचे चेअरमन अशोकराव देशमुख, योगी केशव महाराज, ड्वार्फ केटल या संस्थेचे सीएसआर फंड प्रमुख संतोष जगधने, सौ नताशा जगधने, विद्यालयाचे प्राचार्य शिवराम भोर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. प्रथम सर्व मान्यवरांच्या हस्ते शाळेतील संगणक प्रयोग शाळेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य शिवराम भोर यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

ॲड. आशिष देशमुख यांनी आपल्या वडिलांप्रती आपल्या भावना व्यक्त केल्या. राजीव देशमुख व त्यांच्या पत्नी डॉ. जयश्री देशमुख व सरांचे वडील उत्तमराव देशमुख यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

सरस्वती विद्यालय धामणगाव पाट शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, सर्व पालक तसेच शाळेचे माजी विद्यार्थी, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंद, मित्र, आप्तेष्ट, स्नेहीजन कार्यक्रमाला उपस्थित होते. राजीव देशमुख यांची सेवापूर्ती म्हणजे केवळ एक मेकॅनिकल प्रोसेस आहे. कारण शिक्षक हा कधीही निवृत्त होत नाही. राजीव सरांनी सेवापूर्तीच्या ऊर्जेतून नवीन उपक्रम हाती घ्यावेत असे प्रतिपादन अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले यांनी केले.

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी सुधाकर आरोटे यांनी राजीव देशमुख यांनी तीस वर्ष सरस्वती विद्यालय धामणगाव पाट एकाच विद्यालयात अतिशय सेवाभावी वृत्तीने व निष्ठापूर्वक शिक्षक म्हणून काम केले व ही शाळा नावारूपाला आणली. त्यांच्याच प्रयत्नामुळे आज या शाळेत विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रयोगशाळा उभी राहिली असे म्हणत त्यांचे कौतुक केले.

सिताराम पाटील गायकर यांनी देखील आपल्या अध्यक्षीय भाषणातून राजीव देशमुख सरांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राजीव



देशमुख यांनी विज्ञान शिक्षण देता देता विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण दिले व संगणक प्रयोगशाळा शाळेत उपलब्ध करण्यासाठी व विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी अतोनात प्रयत्न केले व त्यासाठी त्यांना विद्यालयातील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थेचे विश्वस्त मंडळ यासाठी यांनी प्रोत्साहन दिले व सहकार्य केले त्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

त्यांच्या पत्नी अभिनव शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. जयश्री देशमुख यांनी सर्व विद्यार्थी, पालक, अतिथी व उपस्थित मान्यवरांच्या प्रती आपल्या परिवाराच्या वतीने ऋण व्यक्त केले. स्वाती गोसावी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रतिभा कडलग यांनी सन्मान पत्राचे वाचन केले व प्रमिला आवारी यांनी आभार व्यक्त केले. विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## डॉ. गोरख सातकर यांना सर्वोत्कृष्ट पशुवैद्य चिकित्सक पुरस्कार

**श्रीगोंदा । वीरभूमी–**



शिरसगाव बोडखा (ता. श्रीगोंदा) येथील व सध्या रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथे कार्यरत असणारे प्रथितयश पशुधन विकास अधिकारी, श्रेणी–१ डॉ. गोरख पांडुरंग सातकर यांचा औंध, पुणे येथील पशुसंवर्धन कार्यालयाच्या कामधेनु सभागृहात दि.२६ रोजी पार पडलेल्या जागतिक पशुवैद्य दिन या कार्यक्रमात डॉ. प्रवीणकुमार देवरे आयुक्त पशुसंवर्धन पुणे विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट पशुवैद्यकीय चिकित्सक म्हणून सन्मानचिन्ह देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय विषाणू संस्थेचे संचालक डॉ. नवीनकुमार होते. कार्यक्रमाला पशुवैद्य खात्यातील जेष्ठ अधिकारी व पुणे जिल्ह्यातील पशुवैद्यक संघटनेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सातकर यांचे पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## महिलांच्या पुढाकारातून हनुमान नगरला श्रीमद् भागवत कथा व शिवलीलामृत पारायण सोहळा

**नगर । वीरभूमी–**

केडगाव येथील हनुमान नगर परिसरात विठ्ठल–रुक्मिणी मंदिराच्या प्रांगणात सात दिवस चाललेल्या श्रीमद् भागवत कथा व शिवलीलामृत ग्रंथ पारायण सोहळ्याची सांगता रविवारी (दि. २७ एप्रिल) उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाली. या सप्ताहाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे परिसरातील महिलांनी पुढाकार घेऊन संपूर्ण सोहळ्याचे आयोजन व नियोजन केले होते. हा धार्मिक सोहळा सलग तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आला. सप्ताहात दररोज काकड आरती, ग्रंथ वाचन, हरिपाठ व श्रीमद् भागवत कथा आयोजित करण्यात आली होती. संपूर्ण परिसर भक्तिभावाने न्हालेला होता. या धार्मिक कार्यक्रमाची सांगता ह.भ.प. बालयोगी ब्रह्ममूर्ती बाबाजी महाराज चाळक यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. बाबाजी महाराजांनी राम व कृष्ण चरित्रातील साम्य व वैशिष्ट्ये प्रभावीपणे उलगडून दाखवली. विशेषत: तरुण–तरुणींना जीवनातील संस्कारांचे महत्त्व पटवून देताना त्यांनी आजच्या काळातील दृष्ट शक्तींचा नाश करण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा उपस्थितांनी जाहीर निषेधही व्यक्त केला. या धार्मिक सप्ताहात ह.भ.प. केशव महाराज बाबर देऊळगावकर यांच्या प्रभावी वाणीने भाविक मंत्रमुग्ध झाले. कथेमध्ये अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून कृष्णचरित्रातील क्रांतीकारक बाजू उलगडण्यात आली. काल्याच्या किर्तनानंतर दहीहंडी फोडून सप्ताहाची सांगता करण्यात आली. बाबाजी महाराज चाळक यांचा परिसरातील सर्व महिलांच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी इंदुबाई कदम, सुनीता पवार, निर्मला इंगळे, भक्ती पवार, सरिता भगत, रोहिणी बनकर, शितल नाडे, ॲड. निलीमा मुसळे, नंदा नामदास आदी महिलांनी नियोजनाची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग, ॲड. गोरख मुसळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सप्ताहात ह.भ.प. गणेश महाराज गोंडे, विष्णु महाराज घुणे, दत्तात्रय महाराज तापकीर, उमेश महाराज माळी, दिलीप महाराज खळतकर, माऊली महाराज सौताडे यांनी संगीताच्या साथीसह वातावरण अधिक रंगतदार केले. शेवटी महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला. संपूर्ण सप्ताह सोहळा हनुमान नगर येथील शिवभक्त युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या परिश्रमाने यशस्वीपणे पार पडला.

# निमगाव वाघात घुमला भिर्रर्र.. भिर्रर्र..चा आवाज

### बिरोबा महाराज यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यत उत्साहात | जिल्हाभरातून बैलगाडा मालक-चालकांचा उत्स्फूर्त सहभाग

**नगर । वीरभूमी–**



निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराज यांच्या वार्षिक यात्रा उत्सवानिमित्त पारंपरिक बैलगाडा शर्यतीचे भव्य आयोजन करण्यात आले. संपूर्ण नगर जिल्ह्यातून बैलगाडा मालक व चालकांनी या शर्यतीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. बैलगाडा घाटात भिर्रर्र... ची आरोळी घुमली आणि वातावरण ढोलताशा व तुतारीच्या निनादाने दुमदुमले.

ग्रामस्थांच्या वतीने वाजतगाजत बैलांचे स्वागत करण्यात आले. सकाळी सुरुवात झालेली शर्यत संध्याकाळपर्यंत रंगली. पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शर्यतीचा आनंद लुटला. एकाच दिवशी तब्बल ७० बैलगाड्यांनी घाटात दमदारपणे पळाले.

या शर्यतीमध्ये पहिल्या तीन स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक : मयुर सुरसे (भाळवणी), गिरीष वाखारे व अतुल खरमाळे (जुगलबंदी, भांडगाव), द्वितीय क्रमांक : कानिफनाथ बैलगाडा संघटना (निमगाव वाघा), स्वामी समर्थ बैलगाडा संघटना, जयराम आहेर (धुळ्या ग्रुप, गोरेगाव), तृतीय क्रमांक : गणेश कोकाटे, अभिजीत उंडे (जुगलबंदी), बाळासाहेब तन्मर (राहुरी) यांनी बक्षीसे मिळवली. वैभव पायमोडे यांनी फळीफोड प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. तर घाटाचा राजा हा मानाचा सन्मान अभिजीत उंडे व गणेश कोकाटे (जुगलबंदी) यांना देण्यात आला.

विजेत्यांना अनुक्रमे ५१ हजार, ३१ हजार आणि २१ हजार रुपयांचे रोख बक्षीस व गौरवचिन्ह देण्यात आले. हे बक्षीस राजेंद्र शिंदे, समर्थ क्रॉप केअर आणि निमगाव वाघा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य व डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या वतीने सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अरुण फलके, दूध डेअरीचे चेअरमन अण्णा जाधव, सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब जाधव, उपसरपंच किरण जाधव, नगर तालुका खरेदी विक्री संघाचे सदस्य भरत फलके, तसेच संजय कापसे, कचरु कापसे, बाबा केदार, सागर कापसे, अतुल फलके, ज्ञानदेव कापसे, किरण कापसे, बंटी जाधव, बापू कापसे, अमोल कापसे, गणेश कापसे, तेजस कापसे आदी उपस्थित होते.

निमगाव वाघा येथे बिरोबा महाराज यात्रेनिमित्त या वर्षी आयोजित बैलगाडा शर्यत गावाचा आणि पंचक्रोशीचा एक महत्त्वाचा सांस्कृतिक सोहळा ठरला. ही शर्यत पारंपरिक उत्साह, निष्ठा आणि स्पर्धात्मकतेने सजली. बैलगाड्यांचे घाटात वेगाने धावणे, मालकांची जिद्द, प्रेक्षकांची उसळलेली गर्दी आणि ढोल–ताशांचा गजर यामुळे निमगाव वाघा परिसर पूर्णतः यात्रामय वातावरणाने भारवले होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कानिफनाथ तरुण मंडळ, श्री नवनाथ युवा मंडळ, एकता फाऊंडेशन, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था आणि निमगाव वाघा ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले.

## समशेरपुर येथील बिन्नर यांचा वळू ठरला चॅम्पियन

**अकोले । वीरभूमी–**



बारी जहागिरदारवाडी कळसुबाई यात्रा महोत्सव निमित्त कळसुबाई च्या पायथ्याशी एप्रिल महिन्यात देशी – विदेशी जनावरांचे प्रदर्शन भरवण्यात येत असून प्रदर्शनाचे हे चौथे वर्ष आहे. जहागीरदार वाडी येथे दरवर्षी एप्रिल महिन्यात पेसा जहागीरदारवाडी ग्रामपंचायत, पंचायत समिती, आदिवासी विकास विभाग आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डांगी आणि देशी –विदेशी जनावरांचे व कृषीचे प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनासाठी अकोले तालुक्याबरोबर इगतपुरी, संगमनेर, जुन्नर, सिन्नर आदी तालुक्यांतून हजारो जनावरे खरेदी विक्री तर काही जनावरे प्रदर्शनासाठी शेतकरी आणत असतात. सलग ३ दिवस चालणाऱ्या यात्रा महोत्सवात व प्रदर्शनात हजारो नागरिकांनी आपली उपस्थिती लावली होती. जनावरांसाठी यावर्षी वेगवेगळ्या तालुक्यातील ४० शेतकऱ्यांनी आपली जनावरे रिंगणात उतरली होती. या प्रदर्शनचे उद्घाटन तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या शुभहस्ते झाले.

यावेळी सरपंच पंढरीनाथ खाडे यात्रा कमिटी अध्यक्ष हिरामण खाडे, पोलीस पाटील नामदेव खाडे, युवक अध्यक्ष अक्षय आभाळे, पशुवैद्यकीय अधिकारी अशोक धिंदाळे यांचे सह सर्व सदस्य उपस्थित होते. या प्रदर्शनात समशेरपुर येथील मधुकर कारभारी ढोन्नर यांचा वळू (दोन दात) चॅम्पियन ठरला. तर वळू मध्ये प्रथम क्रमांक आदत मध्ये जालिंदर निवृत्ती गंगावणे (ढोकरी), दोन दात– मधुकर कारभारी ढोन्नर, सहा दातमध्ये डांगे गोपालक संघटन वाढवली, त्र्यंबकेश्वर चार दात मध्ये किसन भाऊ गंभीरे (गंभीरवाडी), दुभती गाय मध्ये ज्ञानदेव विठोबा कासार (शरणखेल), कालवडमध्ये दत्तू तुकाराम कोकणे (शरणखेल), गाभण गाय– दत्तू दामू वाजे (खेड भैरव) यांची प्रथम क्रमांक निवड झाली आहे.

सर्व आलेल्या नंबर यांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी उपसभापती भरतराव घाणे, ग्रामसेवक माधव धोंगडे, बारीचे सरपंच वैशाली खाडे, तुकाराम खाडे, वासळीचे सरपंच काशिनाथ कोरडे, राजू काळे, बाळू शिंदे आदी उपस्थित होते. सदर प्रदर्शनात काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून राजुर पोलीस स्टेशनचे सपोनि. दीपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## राष्ट्रवादीच्या मंगल कलश रथयात्रेचे बुधवारी कोपरगाव-शिर्डीत आगमन

**कोपरगाव । वीरभूमी–**



राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यात महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही मंगल कलश रथ यात्रा बुधवार (दि.३० एप्रिल) रोजी कोपरगाव तालुक्यातून शिर्डीत दाखल होणार आहे. या मंगल कलश रथयात्रेचे शिर्डी येथील शासकीय विश्रामगृह येथे सकाळी १०.०० वा.आ. आशुतोष काळे स्वागत करणार असल्याची माहिती कोपरगाव तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे अध्यक्ष चारुदत्त सिनगर यांनी दिली आहे.

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा, सामाजिक समरसतेचा आणि एकात्मतेचा संदेश देणारी हि मंगल कलश रथ यात्रा राज्यभर उत्साहात सुरु आहे. या मंगल कलशमध्ये गडकिल्ले, ऐतिहासिक वास्तूंची माती, नद्यांचे पाणी एकत्रित करण्यात येणार असून कोपरगाव मतदार संघातून वाहणाऱ्या गोदावरी नदीचे पवित्र जल व विविध धार्मिक तीर्थक्षेत्राच्या पावन भूमीतील माती सजविलेल्या मंगल कलशातून मुंबई येथे नेण्यात येणार आहे.

धार्मिक उत्सवाबरोबरच भक्तीच्या संगमातून संस्कृतीचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने या मंगल कलश रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या मंगल कलश रथयात्रेच्या स्वागतास राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन चारुदत्त सिनगर यांनी केले आहे.

# बेलवंडी कोठार येथील ऐतिहासिक बारवची शिवदुर्गकडून स्वच्छता

**श्रीगोंदा । वीरभूमी–**



महाराष्ट्र बारव मोहिम अंतर्गत शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन व शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीच्या वतीने बेलवंडी कोठार येथिल उत्कृष्ट स्थापत्य कलेचा असलेली सुमारे ९०० वर्षापूर्वीची पुरातन बारवेची स्वच्छता केली आहे.

वारसा संवर्धन समितीची ही ४६ वी स्वच्छता मोहीम होती. महाराष्ट्रातील गडकिल्ले आणि बारव संवर्धन कार्य करणाऱ्या शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व वारसा संवर्धन समितीचे सदस्य ईश्वर कोठारे यांच्या नियोजनात ही मोहिम पार पडली. यावेळी १८ शिवदुर्ग सदस्यांनी सहभाग घेतला. मागिल चार वर्षांपासून शिवदुर्ग परिवार श्रीगोंदा तालुक्यात बारव स्वच्छता अभियान राबवत आहे. पूर्वीच्या काळी जिवंत पाण्याचा स्रोत असणाऱ्या आपल्या पूर्वजांचा वारसा जतन करत आहे. शिवदुर्ग परीवाराच्या सदस्यांनी ही बारव स्वच्छता मोहीम राबवली. बारव परिसरात वाढलेली काटेरी झुडपे तोडून बारवेच्या आतील गाळ काढायला सुरुवात केली आहे. मोठया प्रमाणात श्रमदान केले. आतील परिसर स्वच्छ केला. ही संपुर्ण बारव मोकळी केल्यानंतर ही मोहिम समाप्त होईल. अजुन काही दिवस ही मोहिम येथे सुरू राहील असे ईश्वर कोठारे यांनी सांगितले.

या मोहिमेत संचालक अजित दळवी, उपाध्यक्ष सचिन भोसले, दिगंबर भुजबळ, अमोल बडे, प्रा. भरत खोमणे, प्रा. प्रणव गलांडे, ॲड. गोरख कडूस, मारूती वागसकर, अक्षय ओहळ, जालिंदर पाडळे, सुचित्रा दळवी, निरज पाडळे, अविष्कार इंगळे, वैभवी भोसले, अर्णव बडे, शौर्य भोसले यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. ईश्वर कोठारे यांच्या आईवडिलांनी मोहिमेत राबलेल्या सर्वांच्या अल्पोपहाराची व्यवस्था केली होती.

> बारव हे आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेले वैभव आहे. बेलवंडी कोठार येथे दोन बारवा आहेत. दोन वेगवेगळ्या कालखंडातील दोन वेगवेगळ्या आकाराच्या, स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असणारे हे संपुर्ण महाराष्ट्रातील एकमेव ठिकाण आहे. भविष्यात हा वारसा पर्यटनस्थळ म्हणून विकसित होवू शकतो. महाराष्ट्र बाराव मोहिम सर्व समाजाची मोहिम आहे. या मोहिमेत गावोगावच्या नागरिकांनी उत्स्फर्तपणे सहभागी व्हायला हवे.
>
> **– राजेश इंगळे,**
> अध्यक्ष, शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन.

## छत्रपती कॉलेजचे प्राचार्य सतीशचंद्र सूर्यवंशी आणि समन्वयक डॉ. विलास सुद्रिक यांची करिअर कट्टा राज्यस्तरीय समितीवर निवड

**श्रीगोंदा । वीरभूमी–**





महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा या उपक्रमाअंतर्गत अहिल्यानगर जिल्हा प्राचार्य प्रवर्तक आणि राज्यस्तरीय पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्षपदी श्रीगोंदा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सुर्यवंशी यांची दि. २२ एप्रिल २०२५ रोजी करिअर कट्टाचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे सर यांच्या अध्यक्षतेखाली आणि विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ. नितीन घोरपडे यांच्या उपस्थितीत एकमताने निवड करण्यात आली.

तसेच कॉर्पोरेट व ओव्हरसीज प्लेसमेंट आणि गर्जे मराठी ग्लोबल या राज्यस्तरीय सदस्य समितीपदी कॉलेजचे महाविद्यालयीन समन्वयक डॉ. विलास सुद्रिक यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र नुकतेच महाविद्यालयास प्राप्त झाले.

महाराष्ट्र शासनाच्या या महत्वाच्या उपक्रमात निवड होणे ही संस्थेच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. सन २०२४ मध्ये छत्रपती महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये राबविलेले विविध उपक्रम, महाविद्यालयास मिळालेले विविध राज्यस्तरीय पुरस्कार या सर्व बाबींचा विचार करून सदर निवड करण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये आवश्यक असणारे विविध कोर्सेस तसेच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थी केंद्रित उपक्रम आणि नवीन संकल्पना राज्यात व जिल्ह्यात करिअर कट्टा द्वारे राबवून करिअर कट्टाची व्याप्ती आणखी वाढवणार असल्याचे प्राचार्य डॉ. सुर्यवंशी यांनी नमूद केले.

२०२४ या वर्षात ५० विद्यार्थ्यांची पोलीस, वनरक्षक व इतर सरकारी नोकरीमध्ये तसेच कॅम्पस मुलाखतीद्वारे बँक व इंडस्ट्रीमध्ये १४१ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड झाली. अनेक विद्यार्थी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रातून अध्यापन करत आहेत तसेच प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या सर्व बाबींचा विचार करून ही निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, नागवडे कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाबासाहेब भोस, जिल्हा बँक संचालिका सौ. अनुराधा नागवडे, निरीक्षक सचिन लगड, सर्व विश्वस्त तसेच कॉलेजमधील सर्व कर्मचारी वृदांनी अभिनंदन केले.

# छत्रपती शिवरायांच्या कोणत्याही कामाला निधी कमी पडू देणार नाही

## डॉ. सुजय विखे पाटील । उंबरी बाळापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण

**● संगमनेर । वीरभूमी-**

तालुक्यातील उंबरी बाळापूर गावातील नागरीकांचे मागील अनेक वर्षांचे स्वप्न गावातील प्रत्येक जाती - धर्माच्या माणसाच्या योगदानातून आज पुर्ण होत आहे. हे स्मारक उभे करण्यात १५ ते ८० वर्षापर्यतच्या गावातील सर्व वयोगटातील नागरिकांचा समावेश आहे. आज गावात महाराजांच्या आगमनामुळे गावाची शोभा वाढली असून गावातील अंतर्गत वादामुळे पुतळा बसवण्याचे पुण्यांचे व जबाबदारीचे काम विखे पाटील कटुंबाला मिळाले. त्यामुळे सर्व ग्रामस्थांचे मी आभार मानतो आणि भविष्यात छत्रपती शिवरायांच्या कोणत्याही कामाला निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

### पंतप्रधान मोदींच्या निर्णयाला पाठिंबा

■ यावेळी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात डॉ. विखे पाटील यांनी निषेध केला. हा कार्यक्रम पक्षाचा नसला तरी, पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या सुरक्षेसाठी जो निर्णय घेतील त्याला गावांचा पाठींबा द्या. असे आवाहन यावेळी त्यांनी उपस्थिताना केले असता सर्वांनी ‘भारत मातेचा जयघोष’ करत त्याला पाठींबा दिला.

### गावचे प्रलंबित प्रश्न ताकदीने सोडून : विखे

■ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा उभारणीवरुन गावात अंतर्गत वाद झाल्याचे सांगताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, गाव जर ठरावीक रक्कम देऊन शांत होत असेल तर, आमच्या पैशाची किंमत आजिबात नाही. आमच्यासाठी कार्यकर्त्याची किंमत ही अधिक आहे. त्यामुळे गाव शांत राहिले पाहिजे. या दृष्टिकोनातून हे काम केले, असे सांगून उंबरी बाळापूर गावातील इतर प्रश्न देखील भविष्यात ताकदीने सोडवून कोणताही प्रश्न प्रलंबित ठेवणार नसल्याची ग्वाही त्यांनी ग्रामस्थांना दिली.



संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते शनिवारी (दि. २६) सायंकाळी करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई यासह सर्व लहान मोठ्या पक्षाचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतून आलेले शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. सुजय विखे पाटील पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना कोणाबरोबरही होऊ शकत नाही. छत्रपती शिवराय हे आपले दैवत असून ते आपल्या हृदयात आहेत. महाराजाचे विचार हे बहुजन समाजाला एकत्र घेऊन चालण्याचे होते. त्यामुळे पुतळा उभारणीनंतर गाव विकासाच्या दिशेने नेताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचे अनुकरण करावे असे आवाहन केले.

आजचा कार्यक्रम हा कोणत्याही पक्षाचा नसून भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना असे सर्व पक्षीय लोक या कार्यक्रमाला उपस्थित राहिले आहेत. त्यामुळे उंबरी बाळापूर ग्रामस्थांचे कौतुक करताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा विषय जेव्हा असेल तेव्हा आमच्यामध्ये जात, धर्म आणि पक्ष आडवा येणार नाही, हे सिद्ध केले असल्याचे गौरवोद्गार काढले. तर उंबरी बाळापूर नंतर कोल्हार आणि शिर्डी या ठिकाणी देखील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारत शिवसृष्टी तयार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

---

## युवानेते विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसानिमीत्त शिरसगाव सावळगाव शाळेत आदिवासी मुलांना शालेय वस्तुचे वाटप

**● कोपरगाव । वीरभूमी-**

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अभ्यासु युवा अध्यक्ष व राज्य सहकारी साखर संघाचे संचालक विवेक भैय्या कोल्हे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन कोपरगावं तालुका औद्योगिक वसाहतीचे उपाध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सदस्य केशव भवर यांनी शिरसगांव सावळगांव जिल्हा परिषद शाळेतील आदिवासी मुला-मुलींना शालेयपयोगी वस्तु व गणवेशाचे वाटप केले.



प्रारंभी जम्मु काश्मीर मधील पहलगाम येथे अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २८ देशबांधवांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी केशव भवर म्हणाले की, युवानेते विवेक भैय्या कोल्हे यांनी पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभुमीवर यंदा वाढदिवस साजरा न करण्याची भुमिका घेत या हल्ल्यात निरपराध व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागले त्याबद्दल शोक व्यक्त करून श्रध्दांजली वाहिली. युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी अल्पावधीत येसगांवपासुन ते राज्यपातळीपर्यंत व जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या इफको या संस्थेत आपल्या कामकाजाचा ठसा उमटविलेला आहे. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे व माजी आमदार सौ स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या विचारांचा वारसा जपत युवानेते विवेक भैय्या कोल्हे यांनी सामाजिक वाटचाल सुरू केली आहे. कोपरगांव औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक या नात्याने त्यांनी उद्योग, शेती, अर्थकारण, बँकींग, शिक्षण, सहकार, आदि क्षेत्रात काम करून विकासावर सातत्याने भर दिलेला आहे. त्यांच्या वाढदिवसाची आठवण म्हणून आदिवासी मुला मुलींना शालेय वस्तु वाटप केल्या त्यात शिरसगांव सावळगांवसह पुर्व भागातील प्रत्येक सहकारी व्यक्तींची साथ लाभली आहे. ग्रामिण भागातील मुला मुलींमध्ये गुणवत्ता आहे मात्र त्याला योग्य पध्दतीने आकार देवुन त्यांचा राज्य व राष्ट्रीय स्तरावर सन्मान कसा वाढेल यासाठीही युवानेते विवेक भैय्या कोल्हे सतत कार्यरत राहतात हे गौरव आणि सांगावेसे वाटते असे ते शेवटी म्हणांले.

## युवानेते विवेक कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त साई आश्रया अनाथ आश्रमात मिष्टान्न भोजन

**● कोपरगाव । वीरभूमी-**

सहकार महर्षी कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष व संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक, युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजाप्रती अनोखी बांधिलकी जपत अनाथ आश्रमात भोजनाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, देशावर शोककळा पसरलेली असताना विवेकभैय्या कोल्हे यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या संवेदनशील निर्णयाला आदरपूर्वक प्रतिसाद देत, संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या युवासेवकांनी शिर्डी येथील साई आश्रया अनाथाश्रमात अनाथ बालकांना व वृद्धांना मिष्टान्न भोजनाचे आयोजन करून मानवतेचे उदाहरण घडविले.



या प्रसंगी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान, युवासेवक सर्व श्री विशाल गोर्डे, सिद्धार्थ साठे, रामदास गायकवाड ,दिनेश आदमाने, रोहित कणगरे, स्वप्निल मंजुळ, सतीश निकम, समाधान कुऱ्हे, प्रशांत संत, अजय शार्दुल, सागर राऊत आणि शुभम गिरे यांनी उपस्थित राहून प्रेमाने सेवा केली. अनाथ बालकांना व वृद्धांना प्रेमाने भोजन वाढले गेले आणि त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य या उपक्रमाच्या यशस्वीतेची साक्ष देत होते.

संजीवनी युवा प्रतिष्ठान ही संस्था केवळ सामाजिक कार्याच्या नावाखाली उपक्रम राबवत नाही, तर युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना रुजविण्याचे कार्य करत आहे. विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली युवकांना योग्य दिशा मिळते आहे आणि त्यातून समाजहिताची जाणीव असलेली सक्षम पिढी घडते आहे. त्यांच्या कार्यशैलीचा आदर्श घेत युवकांनी हा सामूहिक उपक्रम हाती घेऊन सामाजिक जाणीवेसोबत संवेदनशीलतेचाही आदर्श घालून दिला आहे.


आज संजीवनी युवा प्रतिष्ठान ही संस्था केवळ युवकांच्या उभारणीसाठीच नव्हे, तर समाजाच्या सर्व थरातील लोकांसाठी आशेचा किरण बनली आहे. विवेकभैय्या कोल्हे यांचे नेतृत्व आणि त्यांच्या मूल्यांवर आधारित कार्यपद्धतीमुळे आज संस्थेच्या उपक्रमांना व्यापक सामाजिक मान्यता लाभली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजसेवेचा संदेश देत, विवेकभैय्या कोल्हे यांच्या वाढदिवसाला खऱ्या अर्थाने अधिक मोल प्राप्त झाले.

---

## अगस्ति विद्यालयाचा शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल उत्कृष्ट

**● अकोले । वीरभूमी-**

येथील श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीचे अगस्ति माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अकोले विद्यालयाचा पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८ वी २०२५ चा निकाल कौतुकास्पद लागला असून निकालाची अखंड परंपरा कायम राखत विद्यालयाने गौरवास्पद कामगिरी केली आहे.



संस्थेचे संस्थापक सेक्रेटरी गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी तथा बाबा यांनी सातत्याने बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणातून ज्ञानाचे धडे देत सुसंस्कारित करण्याबरोबर गुणवत्तेला प्राधान्य देत लोकशिक्षण दिले. सामाजिक, सांस्कृतिक वारसा पुढील पिढीला प्रेरक ठरावा यासाठी संस्थेच्या सर्वच विद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातून संस्कारित केले. तर बाबांच्या पश्चात कै दुर्गाबाई नाईकवाडी तथा आई यांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत संस्थेची धुरा सांभाळली आणि प्रत्यक्ष विद्यालयाना भेटी देत गुणवत्ता वाढविण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यासाठी मार्गदर्शन केले. आजही संस्था व्यवस्थापन तोच समृद्ध वारसा पुढे नेत संस्थेच्या सर्वच विद्यालयात सहशालेय उपक्रमाबरोबर शिष्यवृत्ती परीक्षा, एन. एम. एम. एस. परीक्षा, नवोदय, १० वी बोर्ड, १२ वी बोर्ड परीक्षा आदी परीक्षांचे उत्तम नियोजन, सराव, तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, वैयक्तिक मार्गदर्शन देण्यासाठी संस्था व्यवस्थापन नेहेमीच तत्पर असते. अगस्ति विद्यालयाने यावेळी प्राथमिक स्तर इयत्ता ५ वी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात गुणवत्ता राखत १३ विद्यार्थी तर पूर्व माध्यमिक स्तर इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा २१ विद्यार्थी पात्र ठरले. प्राथमिक विभागातून प्रियदर्शनी भवार, आदिती शिंदे, नूतन दराडे, साईश्री ढोकरे, प्रज्वल वैराळ, सर्वेश शेणकर, आशिष गोडे, प्रज्ज्वल आरोटे, प्रांजली रोंगटे, कार्तिकी नवले, अजिंक्य वैद्य, तेजस माने, आराध्या लहामटे व माध्यमिक विभागातून अर्णव सोनवणे, पलक आवारी, दीक्षा मंडलिक, आयुष आवारी, प्रणिता दराडे, अनुष्का आवारी, स्वरा धुमाळ, आर्या वैराळ, सायली गवांदे, प्रणित पाचपुते, सर्वेश नाईकवाडी, श्रेया डगळे, कार्तिक ढगे, मित भोयर, प्रणित आवारी, आरुषी नवले, आर्य गुजर, अस्मिता सुपे, अनुष्का आवारी, पियुष दिघे, प्रज्वल एरंडे या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, मुख्याध्यापक शिवाजी धुमाळ, उपमुख्याध्यापक प्रकाश सोनवणे, पर्यवेक्षक मंगेश खांबेकर, संजय शिंदे व मार्गदर्शक शिक्षक अनिल दाते, विजय उगले, सुनिता नाईकवाडी, विठ्ठल पटेकर, प्रशांत वाकचौरे, कविता शेटे, अनिता पापळ, स्मिता देशमुख, प्रमिला आरोटे, अंकिता दराडे, सुरज गायकवाड, घनश्याम माने, राहुल जाधव, प्रकाश आरोटे आदींसह पालक वर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संत शेख महंमद महाराज मंदिराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; घनश्याम शेलार अन्नत्याग आंदोलन करणार

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

श्रीगोंदाच नव्हे तर राज्यातील संपूर्ण वारकरी संप्रदाय व भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान व शहराचे ग्रामदैवत संत श्री शेख महंमद महाराज मंदिराचा जीर्णोद्धार होण्यासाठी गेल्या अकरा दिवसांपासून तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या धरणे आंदोलनाकडे तालुका व जिल्हा प्रशासन अक्षम्य दुर्लक्ष करत आहे. हा सर्व प्रकार चीड आणणारा असून त्याचा निषेध करण्यासाठी गावकऱ्यांच्या वतीने व स्वतः आत्मक्लेश करण्यासाठी सोमवार दि.२८ आंदोलन रोजी पासून अन्नत्याग आंदोलन करणार असल्याची माहिती ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

यावेळी श्री. शेलार म्हणाले की, गेल्या १७ एप्रिल पासून संत श्री शेख महंमद महाराज मंदिराचा जीर्णोद्धार होण्यासाठी हभप बंडातात्या कराडकर, माणिक महाराज मोरे, जब्बार महाराज, यांच्या नेतृत्वाखाली वारकरी, गावकरी यांच्यासह लोकप्रतिनिधी, सर्वपक्षीय राजकीय नेते मंडळीच्या उपस्थितीत भव्य मोर्चा, गाव बंद आंदोलनापासून तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू आहे. भजन,





कीर्तन, प्रवचन, पोवाडे, एकतारी व महाआरती असे कार्यक्रम नित्य सुरू असले तरी आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून अजूनही प्रशासनाने आंदोलकांचे निवेदन देखील घेतले नाही. प्रशासनाला या महत्त्वाच्या प्रश्नाचे गांभीर्य नसल्याने नेहमीसारखी चालढकल सुरू आहे. या अक्षम्य दुर्लक्षामुळे विविध संघटनांच्या महाआरती निमित्ताने शांताता प्रस्थापित करण्याच्या घेतलेल्या शांतता कमेटी बैठकीत जेष्ठ नेते घनश्याम शेलार व बाबासाहेब भोस यांनी प्रशासनाने या प्रश्नाकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे सांगितले होते.

शांततामय आंदोलनाला प्रशासन दुर्लक्ष करून आंदोलन कमकुवत कमकुवत करत असल्याने त्याचा निषेध म्हणून सोमवार दि. २८ एप्रिलपासून अन्नत्याग आंदोलन करणार असल्याचे ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.